Estd. 1962
NAAC "A" Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.३०/०५/२०१९ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र विधान मंडळाचे पावसाळी अधिवेशन दि.१७/०६/२०१९ पासून सरू होत आहे. यास्तव अधिवेशनाच्या कामकाजाच्या अनुषंगाने विद्यापीठाशी संबंधित माहिती शासनास तात्काळ उपलब्ध करून देण्यासाठी **समन्वयक अधिकारी म्हणून डॉ.व्ही.जे.ढेरे, उपकुलसचिव, आस्थापना विभाग यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

या अधिवेशनामध्ये सन्माननीय विधानपरिषद / विधानसभा सदस्य यांचेकडून प्रश्न उपस्थित केले जातात. या प्रश्नांची उत्तरे व पूरक टिपणी बहुतांशी विभागाकडून अत्यंत त्रोटक स्वरूपात तसेच प्रश्नांच्या अनुषंगाने विहित कालमर्यादेत प्राप्त होत नाही. त्यामुळे शासन स्तरावरून या सदंर्भात कार्यवाही करतांना अडचणी निर्माण होतात. तसेच विधानमंडळात सदरचा प्रश्न प्रत्यक्ष चर्चेला आला असता त्याच विषयाच्या अनुषंगाने इतर उपप्रश्नांवर देखील चर्चा होत असते. त्यामुळे विधानपरिषद / विधानसभा प्रश्नांची उत्तरे व पूरक टिपणी शासनास व संचालनालयास सादर करतांना त्या प्रश्नांच्या अनुषंगाने उपस्थित होऊ शकणारे इतर उपप्रश्न देखील विचारात घेऊन विभागाकडून उपप्रश्नांच्या संदर्भातील स्वतंत्र सविस्तर टिपणी तसेच आवश्यक असल्यास सांख्यिकीय आकडेवारी देखील मूळ पूरक टिपणीसोबत अतिरिक्त स्वरूपात स्वतंत्रपणे पाठविण्यास यावी. यास्तव आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या तारांकित / अतारांकित प्रश्नावर तात्काळ कार्यवाही करून, त्याची एक प्रत आस्थापना विभागास देण्यात यावी.

तरी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी कळविल्यानुसार विद्यापीठातील तारांकित / अतारांकित प्रश्नांची उत्तरे / पूरक टिपणी त्याच दिवशी सादर करण्यात यावेत. विधानमंडळ कामकाजाचे गांभीर्य पाहता कार्यालय सोडण्यापूर्वी संचालनालयाकडे / विभागीय सहसंचालक कार्यालयाकडे काही तातडीची माहिती आवश्यक आहे किंवा कसे याची खात्री करूनच सहायक कुलसचिव व अधीक्षक यांनी समन्वयक अधिकाऱ्यांची परवानगी घेवूनच कार्यालय सोडावे. संचालनालय / विभागीय सहसंचालक यांना देण्यात येणाऱ्या तारांकित / अतारांकित प्रश्नांच्या उत्तरांची छायांकित प्रत इकडील विभागास पाठविण्यात याव्यात. सदरचे परिपत्रक विभागातील सर्व अधिकारी / सेवकांच्या निदर्शनास आणावे.

कुलसचिव

**जा.क्र. एसयुके/आस्थापना-२ /** ३०८१ **दिनांक :-** 13 JUN 2019

**प्रति,**

१. सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक व सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
३. संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र ४. संचालक, विद्यार्थी कल्याण ५. सर्व रेक्टर्स

**प्रत :-** मा.कुलगुरू, मा.प्र-कुलगुरू, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय.